**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ९९ वा ● शनिवार २६ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 99 | Date : 26/08/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4



## ✻ सुविचार ✻

मनात ध्येयाची ऊर्मी असेल तर पायात धावण्याची गती येते.

## संपादकीय

### आता भारत सर्वशक्तीमान...

सर्वांगीण विकास होईल, माणसे विचारशील बनतील आणि त्यांचे सामाजिक भान वाढेल हे थोरामोठ्यांचा विचार खोटा ठरवायचे सामान्य माणसाने ठरवले असावे का? शिक्षणाचा आणि सुसंस्कृततेचा काहीच संबंध नाही हे पटवून द्यायचा चंग अनेकांनी बांधला असावा का? तसे नसते तर सार्वजनिक संपत्तीची तोडफोड, सार्वजनिक सुविधांचा गैरवापर आणि नियमांची ऐशीतैशी अनेकांनी केली असती का? सामाजिक बांधिलकीचा कपाळमोक्ष झाल्याची भावना निर्माण होईल अशी घटना सोलापुरात नुकतीच घडली. करमाळा उपजिल्हा रुग्णालयातील अतिगंभीर रुग्णांना प्राणवायूचा पुरवठा केला जात होता. तो अचानक विस्कळीत झाल्याचे लक्षात येताच संबंधितांची धावपळ झाली. असे का घडले याचा शोध घेतला गेला. तेव्हा एका अज्ञात व्यक्तीने रुग्णांना प्राणवायूचा पुरवठा करणारा पाइपच चोरून नेल्याचे उघड झाले. नागपूरमध्ये काही लोकांनी मेट्रोच्या डब्यांचे विद्रुपीकरण केले. त्यांना रंग फासला. सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये असभ्य भाषेत काहीतरी लिहिले जाते. सार्वजनिक उत्सवाप्रसंगी रस्ते खोदले जातात. मुद्दा कोणताही असूदे सामाजिक आंदोलनांमध्ये पहिला बळी सार्वजनिक संपत्तीचा जातो. विशिष्ट प्रसंगांमध्ये कसे वागावे? काय बोलावे? हे शाळा आणि घरांमध्ये शिकवले जात नसावे का? मुले पालकांकडे बघून अनेक गोष्टी शिकतात याची जाणीव किती पालकांना असते? अनेक पालकांचेच सामाजिक वर्तन आक्षेपार्ह आढळते. माणसे नियम मोडतात. पर्यटनस्थळी बंधनांकडे दुर्लक्ष करतात. उगाचच रस्त्यावरील झाडांच्या फांद्या मोडतात. सार्वजनिक नळांना तोट्या नसतात. जिथे असतात तिथले नळ सुरूच असतात. पाणी वाया जाते. अशी माणसे पालक असतील तर त्यांच्याकडून त्यांची मुले काय शिकू शकतील? स्वयंशिस्तीचा अभाव म्हणूनच आढळत असावा का? चांगल्यावाईटाचे भान मुलांना देणे ही सामूहिक जबाबदारी असली तरी ती प्रामुख्याने पालकांची पण नसते का? सामाजिक भान सुटल्याचे दुष्परिणाम फक्त समाजापुरते मर्यादित नसतात. ते घरापर्यंत देखील पोहोचतात. मुले मोठ्याचा आदर ठेवत नाहीत. आई- वडिलांना मान देत नाहीत. प्रसंगी मारहाण करतात. त्यांना घराबाहेर काढतात. त्यांच्या वर्तनात आपुलकी आणि जिव्हाळा नसतो. विधिनिषेध सुटल्याचेच हे परिणाम नाहीत का? व्यक्तीच्या वैयक्तिक आणि सामाजिक वर्तनातील दुजाभाव कोणाच्याच हिताचा नाही, याची जाणीव होणे हीच कदाचित बदलाची सुरुवात ठरू शकेल.

## एमपीएससीच्या परिक्षेत नळदुर्ग येथील पुजा कांबळे यांचे यश

वागदरी/प्रतिनिधीः नळदुर्ग ता.तुळजापूर येथील दलित पँथर चळवळीतील लढवय्य कार्यकर्ते लक्ष्मण ऊर्फ प्रमोद कांबळे यांची कन्या पुजा लक्ष्मण (प्रमोद) कांबळे यांनी एमपीएससीच्या परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. पुजा कांबळे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून पदवी संपादन केली व महाराष्ट्र राज्य शासनाच्या सेवेत अधिकारी म्हणून नोकरी मिळवण्यासाठीचे ध्येय निश्चित करून त्यांनी एमपीएससी परिक्षेची तयारी केली. राज्य कर निरिक्षक पदा



करिता नुकतेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षेत सहभाग घेतला. सरद एमपीएससीच्या परिक्षेचा निकाल लागला असून त्या परिक्षेत पुजा कांबळे ही चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. लवकरच ती राज्य विक्री कर निरिक्षक पदावर विराजमान होणार आहे. तिने मिळविलेल्या या यशा बद्दल नळदुर्ग येथे रिपाइं (आठवले)चे दुर्वास बनसोडे, बाबासाहेब बनसोडे, महादेव कांबळे,दत्ता बनसोडे, एस.के.गायकवाड, दत्ता सुरवसे, अरुण लोखंडे, बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे,परिवर्तन सामाजिक संस्थेचे मारूती बनसोडे,सम्राट ग्रुपचे पप्पू सुरवसे, डॉ.आंबेडकर स्कूलचे संस्थापक मारुती खारवे,देवानंद बनसोडे,माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर,सहशिक्षक सचिन कांबळे, भैरवनाथ कानडे, युवा कार्यकर्ते अजय बागडे,विश्वास रणे,उमेश गायकवाड,जेष्ठ कार्यकर्ते विठ्ठलबापू बनसोडे,बापू दुरुगकर,दिपक कांबळे सह कार्यकर्ते,नातेवाईक यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून पेढे वाटून,चौकात अभिनंदनाचा फलक लावून आनंद व्यक्त केला असून पुजा कांबळे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चळवळीचा एकनिष्ठ झंझावात –पँथर राजा सरवदे ते लोकनेते राजाभाऊ सरवदे

सोलापूर जिल्ह्यात फुले शाहू आंबेडकरांचे विचार घेऊन सोलापूर शहर व जिल्ह्यात आंबेडकरी चळवळ उभे करणारे राजाभाऊ सरवदे यांचा जन्म मिलिंद नगर बुधवार पेठ येथे २६ ऑगस्ट १९५८ रोजी सरवदे घराण्यात झाला राजाभाऊ सरवदे यांचे प्राथमिक शिक्षण मनपा शाळा क्रमांक ११ मधून झाले आणि महाविद्यालय शिक्षण जैन गुरुकुल आणि दयानंद कॉलेज येथे झाले सोलापूर जिल्हा हा मूळतः अनेक चळवळींचा जिल्हा म्हणून ओळखला जातो आणि या चळवळीतच राजाभाऊ सरवदे यांची जडणघडण झाली सन १९७४ –७५ साली जैन गुरुकुल ला असताना तेव्हाची जुनी अकरावी या महाविद्यालयीन वयातच चळवळींशी राजाभाऊंचा जवळचा संबंध आला त्यावेळी बिहारचे बेलचे प्रकरण, दलित अत्याचार ,वरळीची दंगल, या सर्व प्रश्नांवर मुंबईमध्ये ९ जुलै १९७१ साली राजा ढाले, नामदेव ढसाळ ,भाई संगारे यांनी दलित पँथरची स्थापना केली आणि दलिताच्या अत्याचाराला आक्रमकपणे वाचा फोडली दलित पँथर वाऱ्यासारखी राज्यात व देशात पसरत असताना १९७४ साली सोलापुरातील सुभाष चौक येथे त्या वेळचे तत्कालीन संचारचे संपादक श्री रंगा अण्णा वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली राजा ढाले आणि प्राध्यापक अरुण कांबळे यांची दलित पँथरची सभा झाली प्राध्यापक अरुण कांबळे यांचे आक्रमक भाषण झाले आणि ही सभा उधळण्याच्या प्रयत्नाने दंगा उसळला आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोवर दगडफेक करत असताना त्यावेळी राजाभाऊ सरवदे आणि राजा इंगळे यांनी तो फोटो हातात घेऊन बाबासाहेबांच्या फोटोला सुरक्षित ठिकाणी घेऊन गेले तिथूनच खऱ्या अर्थाने राजाभाऊंचा संघर्ष सुरू झाला होता त्यानंतर पँथर चा झंजावात फोफावत असताना सोलापूर जिल्ह्यामध्ये पँथर च नेतृत्व बी.के .सीतासावंत एस .आर गायकवाड सारखे वरिष्ठ व्यक्ती करत होते आणि दयानंद कॉलेजमधूनच के. पी. गायकवाड बी.के .सीतासावंत यांच्या बैठका चालायच्या महाविद्यालयातच १९७७ साली राजाभाऊ सरवदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट असोसिएशन ही संघटना कार्यान्वित करून विद्यार्थी आणि दलित चळवळीचे प्रश्न सोडवण्यास सुरुवात केली आणि महाविद्यालयीन वयातच राजाभाऊ सरवदे चळवळीशी एकरूप होत गेले पुढे १९७५ ला शंकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना दलित अत्याचार दलित प्रश्न यांच्यावर अतिशय आक्रमकपणे काम करणाऱ्या दलित पँथर चे विसर्जन करावे यासाठी राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्यावर दबाव आणला गेला दलित पँथर च विसर्जन झालं पुढे १९७७ ला सोलापूर मध्ये मोठी दंगल उसळली दोन दिवस संचारबंदी होती आणि त्या दंगली मध्ये आंदोलन राजाभाऊ सरवदे यांनी आंदोलन यशस्वीपणे हाताळले व शहरात शांतता प्रस्थापित केली दलित पँथर च्या विसर्जना नंतर पुढे दुसऱ्या टप्प्यामध्ये रामदास आठवले ,अविनाश मातेकर, गंगाधर गाडे ,प्रीतमकुमार शेवगावकर, यांची औरंगाबाद येथे बैठक होऊन वाढत चाललेल्या दलित अत्याचार आणि दलित प्रश्नांवर भारतीय दलित पँथर ची स्थापना झाली आणि राजाभाऊ सरवदे यांनी रामदासजी आठवले यांच्या समवेत भारतीय दलित पँथर च काम सुरू केलं रामदासजी आठवले आणि राजाभाऊ सरवदे यांचा संबंध भारतीय दलित पँथर मुळेच आला १९७९ ला अरुण कांबळे अध्यक्ष असलेल्या भारतीय दलित पँथरचे रामदास आठवले हे संघटक होते ते सोलापूरला बैठकीला आले असता खणी येथे बैठक संपन्न झाली या बैठकीला राजाभाऊ सरवदे उपस्थित होते तेव्हाच्या बैठका या कार्यकर्त्यांच्या घरात महाविद्यालय कॉलेज वस्तीगृह येथे चालायच्या सोलापुरातील दयानंद महाविद्यालयातील एस. के .कांबळे यांच्या रूमवर रामदास आठवले राहायचे बैठका घ्यायचे त्यांच्या समवेत राजाभाऊ सरवदे असायचे आणि सोलापूर जिल्ह्यातील प्रश्नांवर वाचा फुटायची संघटने बाबत निर्णय व्हायचे आक्रमक शैली अभ्यासू वृत्ती आणि कुशल संघटक हे गुण रामदास आठवले यांनी राजाभाऊ सरवदे यांच्यात आधीपासूनच ओळखले होते सोलापूर शहराचा विचार करायचा झाल्यास १९८२ पासून शहरात बुधवार पेठ आताचे मिलिंद नगर ,थोरला राजवाडा दलित विरुद्ध पत्रा तालीम हा संघर्ष नेहमी चालायचा तो संघर्ष मिटवण्याचे काम राजाभाऊ सरवदे यांनी केले १९७८ ला मराठवाडा नामांतराचा ठराव झाला आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दंगली आणि दलितांच्या अन्यायात मोठ्या प्रमाणात वाढ झाली दलितांची घरे जाळण्याचे प्रकार देखील झाले त्यावेळी अनेक आंदोलनामध्ये राजाभाऊंनी भाग घेतला मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे यासाठी राजाभाऊ सरवदे यांनी तब्बल २६ हजार मोर्चे काढले हा एक विक्रमच म्हणावा लागेल राजाभाऊ सरवदे हे रस्त्याच्या संघर्षातून तयार झालेलं नेतृत्व आहे सोलापूर शहरातील आताचे मिलिंद नगर बुधवार पेठ आहे त्याला त्याला १९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार –मांग परिषदेमध्ये थोरला राजवाडा असे नाव दिले त्यामुळे या वस्तीला जोपासण्याचे काम राजाभाऊ सरवदे यांनी आजतागायत केल आहे



१९८१ च्या काळात राजाभाऊ सरवदे हे तहसीलदार डी वाय एस पी ची एमपीएससी प्रीमियम परीक्षा पास झाले होते महाविद्यालयीन शिक्षणानंतर त्यांनी कृषी विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र वित्तीय महामंडळ मुख्य कार्यालय मुंबई येथे ८९ दिवस नोकरी देखील केली परंतु आंबेडकरी बाणा रक्तातच असल्याने त्यांनी आपले पुढचे आयुष्य हे समाजसेवेला आणि चळवळीला अर्पण केले ३१ ऑगस्ट १९८२ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांची सभा राजाभाऊ सरवदे आणि सहकारी यांनी उधळून लावली त्याला कारण होते नामांतर लढा दलित अत्याचार याच प्रश्नावर १९८२ सालची जिल्हा नियोजनाची बैठक देखील राजाभाऊ सरवदे यांनी उधळून लावली होती ते १९८९ च्या दुसऱ्या भारतीय दलित पँथरच्या अधिवेशनाचे अध्यक्ष देखील होते नुसती चळवळ करून पोट भागत नाही त्यासाठी कार्यकर्त्याने उद्योग व्यवसाय उभारावा हे त्यांचे प्रामाणिक मत यासाठी १९८६ रोजी त्यांनी टेम्पो घेतली टेम्पो ते आताचा मध्यवर्ती भागातील असणारा टू स्टार राज–हाईट्स चा प्रोजेक्ट, हॉटेल त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो चळवळ आणि पक्षातील काम यात फरक असतो असे ते मानतात एक पक्ष एक नेता एक झेंडा हे सूत्र त्यांनी आयुष्यभर जोपासले आपल्या नेत्याचा शब्द कधी खाली पडू दिला नाही पक्ष, नेतृत्व, चळवळ बदनाम होईल असे कृत्य त्यांच्या हातून कधीच घडले नाही आपला नेता सांगेल ते धोरण ते बांधतील तेच तोरण या वृत्तीने त्यांनी ४६ वर्षे रामदास आठवले यांच्या सोबत चळवळीचा, रिपब्लिकन पक्षाचं काम केलं १९९९ ला उत्तर सोलापूर विधानसभा मतदारसंघातून त्यांनी आपल्या नेत्याच्या आग्रहास्तर विधानसभा देखील लढवली त्यावेळी राष्ट्रवादी रिपब्लिकन पक्षाची युती असताना देखील लक्ष्मण माने यांच्या बंडखोरीचा सामना पक्षाला करावा लागला पण राजाभाऊ सरवदे यांनी निकराचा लढा दिला १ ऑगस्ट २००४ साली सोलापूर विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर २०१७ साली त्यांनी सिनेट निवडणूक लढवली आणि ते विक्रमी मताने निवडून आले आताच्या विद्यापीठांमध्ये जे अमुलाग्र बदल घडत आहेत त्यात राजाभाऊ सरवदे यांचा वाटा निश्चितच आहे संघर्षातून तयार झालेले हे नेतृत्व कधीच कुठल्या आमिषाला बळी पडले नाही २०१४ ला सोलापुरात लोकसभेला, विधानसभेला जो बदल घडून आला त्यात राजाभाऊ सरवदे यांचा वाटा मोठा आहे चळवळीशी एकनिष्ठ आणि प्रामाणिकपणा यामुळे ३० ऑगस्ट २०१९ रोजी रामदासजी आठवले यांनी महायुतीच्या माध्यमातून राज्यमंत्री दर्जा असलेल्या महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाची सूत्रे राजाभाऊ सरवदे यांच्याकडे दिली .या संधीचं सोनं करत मोडकळीस आलेल्या महामंडळाला राजाभाऊ सरवदे यांनी नव संजीवनी दिली अनेक क्रांतिकारी निर्णय घेऊन राज्यातील मागासवर्गीय तरुणांना जवळजवळ शंभर कोटी रुपयाचे कर्ज वाटप करून कार्यकर्त्यांना तरुणांना स्वावलंबी होण्यास मदत केली शिक्षणामुळे प्रगती होते आणि माणूस घडतो पर्यायाने समाज घडतो म्हणून भुगाव येथे नालंदा शैक्षणिक संस्थेची उभारणी केली तेथे अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात तेथेच वस्तीगृहाची स्थापना केली संपूर्ण महाराष्ट्र हादरवणाऱ्या खैरलांजी घटनेच्या वेळी आणि त्यानंतर उद्भवलेल्या आंदोलनात राजाभाऊ सरवदे यांनी सोलापूर शहरात समाजाचे रक्षक म्हणून भूमिका अदा केली ज्यावेळी अनेक आंबेडकरी तरुणांवर गुन्हे दाखल होत असताना राजाभाऊ सरवदे हे प्रशासनापुढे एकटे उभे ठाकले आणि परिस्थिती मोठ्या चालाकीने हाताळली सोलापूर शहराला किंबहुना मिलिंद नगरला गुन्हेगारी वाद विवाद यांच्या मधून काढून प्रगतीपथावर नेण्याचे श्रेय राजाभाऊ सरवदे यांना जातं रिपब्लिकन पक्षात काम करत असताना सोलापूर जिल्ह्यात त्यांनी अनेक तरुणांना मोठं केलं स्वबळावर जिल्ह्यात नगरसेवक ,पंचायत समिती ,सदस्य ग्रामपंचायत सदस्य ,सरपंच ,उपसरपंच निवडून आणले ज्या पक्षासोबत युती असेल त्या युतीचं काम त्यांनी प्रामाणिकपणे केलेल आहे आणि त्याचे फायदे देखील आज जिल्ह्यात पाहायला मिळतात आज प्रत्येक गावामध्ये वाड्या वस्त्या मध्ये पुढारी नेता होण्याचं जणू एक पेवच फुटले आहे लवकरात लवकर लोकांनी नेता म्हणावं अशी होडच लागलेली आहे पण संघर्ष आणि संयम हे राजाभाऊ यांच्याकडून कडून शिकल पाहिजे .नेता होता येत नसतं लोकांनी नेता मानलं पाहिजे आणि त्यासाठी प्रखर संघर्ष त्याग प्रामाणिकपणा आणि लोकांच समाधान हे सूत्र आहे आणि हे राजाभाऊंनी नेहमी अंगीकारले आहे वरून ताठर दिसणारा हा मनुष्य समाजावर आपल्या कार्यकर्त्यावर तेवढेच निर्मळ प्रेम करतो आज जिल्ह्यामध्ये दशकातील अनेक नेत्यांचा विचार करायचा झाल्यास त्यामध्ये राजाभाऊ सरवदे यांचं नाव निश्चितच कोरल जाईल नुसत्या नावानेच काम होतात अशी ओळख असलेला दमदार व्यक्तिमत्व म्हणजे राजाभाऊ सरवदे काम कोणतेही असो ते राजाभाऊ सरवदे यांनी केलं नाही असं कधीच झालं नाही अनेक जाती –धर्माचे, पक्षाचे, संघटनेचे लोक राजाभाऊंकडे कामे घेऊन येतात आणि समाधानी होऊन जातात हीच राजाभाऊ सरवदे यांची ओळख आहे पक्ष चळवळ याच्याशी राजाभाऊ सरवदे यांनी कधीच तडजोड केली नाही अन्यथा या उंचीचा नेता कधीच आमदार, खासदार, मंत्री म्हणून दिसला असता सोलापूर जिल्ह्यात आंबेडकर चळवळीचा पोलादी पुरुष म्हणून त्यांची ओळख आहे पण आपला आक्रमकपणा प्रामाणिकपणा एकनिष्ठता यामुळे राजाभाऊंचा वेगळेपण दिसून येतं आणि शहर जिल्ह्यात तसीच त्यांची ओळख आहे आक्रमक संघर्षातून तयार झालेल नेतृत्व कार्यकर्त्यांना ताकद बळ देण्याची वृत्ती नेहमी समाजाच्या हिताचा विचार यामुळे राजाभाऊ सरवदे हे पँथरकालीन वृद्धांपासून ते आजकालच्या फेसबुक इंस्टाग्राम च्या जमान्यातील इन्स्टंट तरुणांच्या गळ्यातील ताईत बनलेले आहेत ते नेहमी नवीन जगाशी अपडेट असतात नवीन गोष्टी शिकून घेत असतात त्यामुळे त्यांची शैली ही वेगळीच आहे राजाभाऊ सरवदे हे आपल्या खास केस रचनेमुळे तसेच पोशाखमुळे देखील शहर जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध आहेत रुबाबदार व्यक्तिमत्व, बोलण्याची लखब अनेकांची जिव्हाळ्याचे संबंध यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्याची रिघ लागलेली असते .परिस्थिती मुळे स्वतःला वकील होता आलं नाही म्हणून त्यांनी आपल्या एका मुलाला वकील केलं वकील झालो नाही पण वकिलाचा बाप झालो असे ते आवर्जून सांगतात पुढे त्यांचा वारसा अनेक सामाजिक उपक्रमातून त्यांचे दुसरे सुपुत्र सुशील सरवदे यांनी सुरू ठेवल्याचे दिसून येते आज त्यांचा वाढदिवस आणि त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याला दिलेला हा ओझरता हा उजाळा सर्व मोठी माणसे नेहमी वृद्ध होत असतात पण राजाभाऊ सरवदे यांच्याकडे पाहिले तर आपल्याला ते प्रत्येक वाढदिवसाला चिरतरुण होत आहेत की काय असा भास होतो यामागे त्यांचा निर्व्यसनी स्वभाव व्यायामाची आवड दररोज सकाळी चालणे आधी होय. अशा या चिरतरुण ,दमदार ,दिमागदार रुबाबदार,दमदार आणि संघर्षशील नेत्यास वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा **–प्रा.राहुल रुही भीम नगर अक्कलकोट मो. +९१ ९७६५७ २५१७६**

# लढवय्ये नेतृत्व : संजयजी भोकरे

ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत संघटनेत काम करणार्या पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहेत. पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. यासाठी राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक, दैनिक महानगरी व दैनिक जनप्रवास या दैनिकांचे संपादक तथा अंबाबाई तालिम संस्था मिरज, सांगली या संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त, आमचे मार्गदर्शक संजय भोकरे प्रयत्नशील आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेला कार्याचा आढावा...राज्यातील बहुसंख्य वृत्तपत्रांचे संपादक तसेच पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सभासद आहेत. राज्यातील कोकण, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, नागपूर, पश्चिम महाराष्ट्र या भागात संघटनेने सभासदांच्या विविध प्रश्नांवर मोर्चे, आंदोलने उभारुन हा संरक्षण कायदा अंमलात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, आज त्याला यश मिळाले आहे.



राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी पत्रकार भवन उभारले असून पत्रकारांच्या पाल्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात, उच्च शिक्षणातही सवलती मिळाव्यात तसेच राज्य मराठी पत्रकार संघाचा विस्तार विविध राज्यात करण्यासाठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोकरे प्रयत्नशील आहेत. याबरोबरच राज्यातील पत्रकारांना देशाच्या राजधानीत थांबण्यासाठी पत्रकार भवन उभारले आहे. पुणे, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर याठिकाणी देखील पत्रकार संघाच्या सभासदांसाठी पत्रकार भवन उभारले आहे.

सभासदांना संघटनेमार्फत पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण, शासकीय विश्रामगृहांवर प्राधान्यक्रम, टोलनाके, सभासदांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी राखीव कोठा ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. अधिस्वीकृती धारकांनाच राज्य शासनाच्या मोफत रेल्वे, एस. टी., एअरलाईन, शासकीय विश्रामगृहांवर प्राधान्य दिले जाते त्यामुळे ग्रामीण भागातील पत्रकारांवर अन्याय होतो. आरोग्य, विमा संरक्षण व मोफत प्रवास या तीन मुद्द्यांवर केंद्र व राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून ग्रामीण पत्रकारांना या सवलतींचा फायदा देण्याचा प्रयत्न संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे.

संघाचे सांगली, मिरज या ठिकाणी शैक्षणिक उपक्रम सुरु असून पुणे जिल्ह्यातही असे उपक्रम सुरु करण्याचा मानस आहे. ग्रामीण भागासह वर्तमान पत्रातील श्रमिक पत्रकार, मुक्त पत्रकार, छायाचित्रकार यांच्या संरक्षणासाठी व लढ्यासाठी संघाने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. संघटना कोणतीही असो मात्र पत्रकारांना संरक्षण, त्यांच्या कार्याची दखल घेणारी संघटना भविष्यात पत्रकारांना तारु शकते, त्यासाठी संघटनेमार्फत विभागनिहाय अधिवेशने, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, पत्रकार दिन, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा गुणगौरव व पाठीवर शाबासकीची थाप आम्ही नेहमीच देत आलो आहोत व देत आहोत. संघाने दिवंगत पत्रकारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतही दिली आहे यासाठी भोकरे साहेबांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालुक्यात राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि सभासद आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडविण्याचे काम सातत्याने होत आहे. अनेक पत्रकारांना हलाखीच्या परिस्थितीत पत्रकार संघाकडून आर्थिक मदत केली जात आहे. संघाचे सभासदांना अधीस्वीकृत कार्ड मिळवून देण्यासाठी प्रयत्न होत आहेत. समाजातील विविध घटकांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल पत्रकार संघाकडून गौरविण्यात येत आहे यासाठी मा.भोकरे साहेबांचे मार्गदर्शन मिळत आहे.

संघामार्फत उत्कृष्ट पत्रकारीता जीवन गौरव पुरस्कार, सांस्कृतिक, पत्रकारिता, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य करणार्या व्यक्तींना व संस्थांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. तसेच राज्यभरात पत्रकारांची मोट बांधण्यासाठी राज्य संघटक संजय भोकरे यांच्या कल्पक नेतृत्वातून संघटनेचा विस्तार राज्याच्या पलिकडे जाऊन 'ऑल इंडिया जर्नालिस्ट'ची स्थापना करण्यात आली आहे. नवी दिल्ली येथे भव्य दिव्य इमारतीत हे कार्यालय सुरु करण्यात आले आहे.

कवि कुसुमाग्रज यांनी म्हटल्याप्रमाणे, 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेऊन फक्त लढ म्हणा' या न्यायाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मा.भोकरे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली उद्दीष्ट व ध्येय्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे, करीत राहणार आहे. साहेबांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!

**शब्दांकन : डॉ.विश्वासराव आरोटे**
**प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# वैभवराजे जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त महास्वच्छता अभियानाला सुरुवात



करमाळा /प्रतिनिधीः माजी नगराध्यक्ष ,शिवसेना नेते वैभवराजे जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील करमाळा शहर स्वच्छ करण्यासाठी महास्वच्छता अभियान सुरु केले असून याची सुरुवात आज करमाळा बस स्थानकासमोर सर्व पत्रकारांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आली.यावेळी बोलताना वैभवराजे जगताप म्हणाले की, जनसेवेचा वारसा माझे आजोबा कै.नामदेवराव जगताप आणि माझे वडील जयवंतराव जगताप यांच्याकडून मिळालेला आहे त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील आम्ही माझ्या वाढदिवसानिमित्त इतर अवास्तव गोष्टी टाळून करमाळा शहर स्वच्छ करण्याचे ठरवले आहे.त्यासाठी शहर स्वच्छतेला प्राधान्य देऊन हे अभियान सुरु केले आहे.येत्या काही दिवसांत संपूर्ण शहर स्वच्छ केले जाईल यासाठी शहरवासियांनी या अभियानाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.यावेळी माजी उपनगराध्यक्ष अहमद कुरेशी,अस्लम वस्ताद कुरेशी नजीर अहमद कुरेशी, प्रशांत ढाळे, अॅड नवनाथ राखुंडे,डॉ.मनोज कुंभार, श्रेणीक खाटेर, अमोल परदेशी, सुनिल ढाणे, गणेश कुकडे, जोतिराम ढाणे ,बाळासाहेब कांबळे, युवा सेनेचे मयुर यादव, समीर हलवाई, दादा धाकतोडे,वंचित बहुजन आघाडीचे पप्पू लोंढे ,संभाजी होनप, जगदिश परदेशी, रोहिदास आल्हाट हे मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरबाज लालू घोडके ,ओंकार आल्हाट,तानाजी कुकडे,उत्तम कांबळे, अमीर घोडके ,अक्षय जाधव, केतन इंदूरे ,सुशांत इंदुरे ,अतुल देवकर, सर्जेराव मांगले ,सूरज इंदुरे, बाळा इंदुरे, विनोद कुकडे ,कुमार माने,रणवीर परदेशी,फराज काझी यांच्यासह आजी-माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पोलीस पाटील यांच्या मानधनात वाढ करणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्यातील पोलीस पाटील यांच्या विविध मागण्या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची दिनांक २५/०८/२०२३ रोजी ठाणे येथील निवासस्थानी राज्यातील पोलीस पाटलांच्या विविध मागण्या संदर्भात चर्चा करण्यात आली



व मुख्यमंत्री महोदय यांनी त्यांचे पी.एस. सोनवणे यांना तात्काळ मिटींग लावण्या संदर्भात आदेश देण्यात आले.राज्यातील पोलीस पाटलांची संख्या व सध्या मिळणारे मानधन तसेच मार्च २०१९ रोजीच्या मानधनात झालेली वाढ व आत्ता करण्यात येणारी मानधन वाढ या विषयावर चर्चा करण्यात आली

तसेच महाराष्ट्र राज्यातील पोलीस पाटील यांचा मुख्यमंत्री गृहमंत्री व महसूल मंत्री यांच्या उपस्थितीमध्ये पंढरपूर येथे भव्य मेळावा घेण्याचे नियोजन करण्यात आले. यावेळी पोलीस पाटील संघटनेचे राज्याध्यक्ष दिलीप आबा पाटील राज्य उपाध्यक्ष प्रशांत आप्पा पाटील राज्य प्रसिद्धीप्रमुख तोफिक शेख तसेच शिवसेना सोलापूर जिल्हा उपप्रमुख अण्णाप्पा सतूबर सर व ठाणे विभाग शिवसेनाप्रमुख व राज्याध्यक्ष माथाडी कामगार संघटना दिनेश मलपे,उमेश मळेवाडी उपाध्यक्ष भाजपा दक्षिण सोलापूर तसेच रहेमान आत्तार तालुकाध्यक्ष अक्कलकोट , महादेव पाटील तालुका अध्यक्ष दक्षिण सोलापूर चंद्रकांत चौगुले सैफन बेगडे धर्मराव कोळी श्रीशैल स्वामी नागनाथ उंबरजे विजय गावडे श्रीशैल पाटील आदी पोलीस पाटील उपस्थित होते .

# पैलवान अक्षय कोंडेकर साहेब यांचे स्मरणार्थ मराठी शाळेला स्टेज बांधून देण्यात आला




टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील नेहमी समाजकार्यात अग्रेसर असणारे प्रज्वल कोळी, गणेश गोरे , निशांत गोरे,यांनी पैलवान अक्षय कोंडेकर यांचे स्मरणार्थ जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर येथे भव्य ,दिव्य असा स्टेज बांधकाम करून देण्यात आला. स्वतः या तिघांनी वर्गणी काढून स्टेज बांधकाम पूर्ण केले. मराठी शाळेवर यांचे नितांत प्रेम आहे. आपण या शाळेत शिकलो याची त्यांना जाण आहे. शाळेसाठी त्यांनी फार मोठे मोलाचे योगदान केले आहे. यापूर्वी स्टेज लहान होता. यापूर्वीचा स्टेज लहान असल्यामुळे कार्यक्रमांमध्ये अडचणी निर्माण होत होत्या. ही अडचण लक्षात घेऊन या तिघांनी भव्य ,दिव्य ,सुसज्ज असा स्टेज बांधकाम करून दिला. गावामध्ये यांचे कौतुक होत आहे. व यातून अनेकांना प्रेरणा मिळेल असे वक्तव्य शाळेचे मुख्याध्यापक संजय दळवी सर यांनी केला. सर्वत्र यांचे कौतुक होत आहे.

# शासन आपल्या दारी उपक्रमाच्या जागेची पाहणी

### शासन आपल्या दारी हा उपक्रम पंढरपूर येथे दिनांक १० सप्टेंबर २०२३ रोजी होणार

पंढरपूर/प्रतिनिधीः विविध शासकीय योजनांचा जनतेला थेट लाभ देण्यासाठी शासन आपल्या दारी हा लोकाभिमुख उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. शासन आपल्या दारी अभियानातर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित १० सप्टेंबर रोजी पंढरपूर येथे जिल्हास्तरीय कार्यक्रम नियोजित असून पंढरपूर येथील वाखरी हद्दीतील वाखरी-कोर्टी बाह्यवळणरस्ता येथील जागेची पाहणी प्रशासनाकडून करण्यात आली.

शासन आपल्या दारी उपक्रमामध्ये जनतेला स्थानिक स्तरावरच एकाच छताखाली विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी किमान ३० ते ३५ हजार लाभार्थी येणार आहेत. कार्यक्रमाच्या ठिकाणी किमान शासकीय योजनांची माहिती देणारे ५० स्टॉल लावण्यात येणार आहेत. सध्या पावसाचे दिवस असल्याने नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी कार्यस्थळी वॉटरप्रुफ मंडप उभारणी, आसन व्यवस्था, वाहनतळ, आरोग्य सुविधा, लाभार्थ्यांना लाभाचे मान्यवरांच्या हस्ते वाटपाचे काटेकोर नियोजन, वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी याबाबत नियोजन, विद्युत व्यवस्था आदीबाबतची पाहणी प्रशासनाकडून करण्यात आली.

वाखरी हद्दीतील वाखरी-कोर्टी बाह्यवळणरस्ता येथील जागेच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री सचिवालयाचे डॉ. धीरज चव्हाण, अपर जिल्हा पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव, प्रांताधिकारी गजानन गुरव, अजिंक्य घोडगे, पोलीस उपअधिक्षक रोहिणी बानकर,महावितरणचे अधिक्षक अभियंता संजीवकुमार शिंदे,तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, कार्यकारी अभियंता अमित निंबकर,एस.टी महामंडळाचे विभागीय नियत्रंक विनोद भालेराव,पोलीस निरिक्षक मिलींद पाटील, अरुण फुगे,उपप्रादेशिक परिवहन विभागाचे श्री रायबान उपस्थित होते.

# यशवंतभाऊ नडगम यांना साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे पुरस्कार जाहीर



नंदगाव /अजिंक्य मस्केः जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर आपल्या समाज सेवेत यशाचे शिखर गाठलेल्या आणि बांधीलकी जपणाऱ्या पुणे शहर आणि उपनगरांतील निवडक कर्तृत्ववान व्यक्तींचा आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे तेल वात समिती व पुणे शहर जिल्हा मातंग समाज यांच्यावतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्ताने पुरस्कार वितरण समारंभ येत्या २७ ऑगस्ट रोजी सायं. ५ वा. सावित्रीबाई फुले स्मारक, गंज पेठ, लोहिया नगर, पुणे या ठिकाणी मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. याप्रसंगी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. दलित पँथर चे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भाऊ नडगम यांना साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे व सिने अभिनेते व दिग्दर्शक प्रवीण तरडे यांना फकीरा पुरस्कार,प्रतिभा नारी परिवर्तन संस्था यांना सामाजिक कार्याबद्दल गौरव येणार आहे

समाज भूषण पुरस्कार पुण्याचे पालकमंत्री तसेच उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश दादा बागवे मा. गृहमंत्री हे असणार असून या कार्यक्रमाला आमदार सुनील कांबळे, संजय काकडे, दिलीप कांबळे, माधुरी मिसाळ भगवानराव वैराट, मुरलीधर मोहोळ, पुणे शहर जिल्हा मातंग समाजचे सचिव दयानंद अडागळे व स्वागताध्यक्ष- पंढरीनाथ अढाळगे असे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती कार्यक्रमाचे संयोजक सुखदेव अडागळे प्रमुख आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे तेल वात समिती पुणे यांनी दिली.










युवा नेते
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ)महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष
लोकनेते
राजाभाऊ सरवदे साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा..!!
मा.अविनाश मडिखंबे
तालुकाध्यक्ष
युवा नेते
मा.बसवराज सोनकांबळे
मा.अजय मुकणार
शहराध्यक्ष
मा.राहुल रुही
मा.सोपान गायकवाड
मा.सैदप्पा झळकी
मा.आप्पा भालेराव
मा.अंबादास गायकवाड
26 August
शुभेच्छुक : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ)
अक्कलकोट तालुका व शहर कार्यकारणी


लोकप्रिय आमदार
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ)
महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष
राजाभाऊ सरवदे
आपणांस वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा..!!
मा.प्रदिप जगताप
सरपंच
उपसरपंच
मा.सौ.वनितातार्इ सुरवसे
मा.श्री.कमलाकर सोनकांबळे
: शुभेच्छुक :
ग्रामपंचायत गोगांव
ता.अक्कलकोट जि.सोलापूर


रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ)
महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष
राजाभाऊ सरवदे साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा..!!
मा.श्याम बाबर
संस्थापक/अध्यक्ष
शुभेच्छुक : संघर्ष सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य
* सागरदादा कल्याणशेट्टी युवा मंच, अक्कलकोट


२६
ऑगस्ट
वाढदिवस
अभिष्टचिंतन
लोकनेते
26 August
संघर्षनायक
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ)
महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष
राजाभाऊ सरवदे
साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा..!!
: शुभेच्छुक :
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ)
दुधनी शहर ता.अक्कलकोट
मा.गोरखनाथ धोडमनी


रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ)
महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष
राजाभाऊ सरवदे साहेब
आपणांस वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा..!!
26 August
सचिव : निजप्पा गायकवाड,
उपाध्यक्ष : राहुल रुही
खजिनदार : बसवराज सोनकांबळे,
सहसचिव : डॉ.रविंद्र बनसोडे
संचालक : चंद्रशेखर भांगे,
सुनिल गायकवाड
मा.कमलाकर सोनकांबळे
संपादक : दैनिक यश सिध्दी न्यूज
अध्यक्ष सिध्दार्थ सोशल फौडेशन
शुभेच्छुक : सिध्दार्थ सोशल फौडेशन महाराष्ट्र राज्य व दैनिक यश सिध्दी न्यूज परिवार